प्रेस नोट ता. ०३/०७/२०२४

# चार पिस्टल सहा राउंडसह दोघांना अटक

## गुन्हे शाखा युनिट २ ची कारवाई

मा. पोलीस आयुक्त श्री विनयकुमार चौबे साहेब यांनी अवैध शस्त्रे बाळगणारे गुन्हेगारांची माहीती मिळवुन कायदेशीर कारवाई करणेबाबत गुन्हे शाखांना आदेशीत केले आहे. गुन्हे शाखा युनिट २ चे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम त्यांचे अधिपत्याखालील पोलीस अधिकारी व अंमलदार पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय हद्दीमध्ये अवैध शस्त्र बाळगणा-या गुन्हेगारांची माहीती घेत असतांना दिनांक २५/०६/२०२४ रोजी पोहवा ८३२ जयवंत राऊत यांना त्यांचे गोपनिय बातमीदाराकरवी बातमी मिळाली कि, एक इसम पिस्टल विक्रीसाठी शहीद अशोक कामठे बस स्टॉप जवळ चिंचवड या ठिकाणी आला आहे अशी खात्रीशीर बातमी मिळाली.

गुन्हे शाखा पोलीस उप आयुक्त संदीप डोईफोडे व सहा. पोलीस आयुक्त डॉ. विशाल हिरे यांना याबाबतची माहीती कळवुन त्यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट २ चे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम यांनी गुन्हे शाखा युनिट २ चे पोलीस उप निरीक्षक गणेश माने, श्रेणी पोलीस उप निरीक्षक केराप्पा माने व पोलीस अंमलदार यांचे एक पथक तयार करुन सदर पथकाला सुचना व मार्गदर्शन करुन तात्काळ चिंचवड भागात माहीतीची खातरजमा करणेसाठी पाठविले. शहीद अशोक कामठे बस स्टॉपजवळील देवस्थानच्या मोकळी जागा असलेल्या परिसरात सापळा लावुन पाहणी केली असता बातमीदाराने सांगितलेल्या वर्णनाचा इसम काळया रंगाच्या बॅगसह सदर ठिकाणी थांबला असल्याचे पोलीस पथकाचे निदर्शनास आले. त्याचवेळी सदर इसमाला पोलीस आल्याची चाहूल लागल्याने तो पळुन जावु लागला, पोलीस पथकाने त्याचा पाठलाग करुन अत्यंत शिताफीने पकडले. त्याचे नाव १) दुर्गेश बापु शिंदे वय ३७ वर्षे रा. सरस्वती कॉलनी श्रीरामपुर जि. अहमदनगर असे असुन सदर इसमाचे अंगझडतीत त्याचे बॅगमध्ये दोन देशी बनावटीची पिस्टल व चार जिवंत काडतुसे मिळुन आली. ती युनिट २ चे पोलीस हवालदार जयवंत राऊत यांनी सरकार तर्फे दिले फिर्यादीवरुन चिंचवड पोलीस ठाणे गुन्हा रजिस्टर नंबर २६९/२०२४ भारतीय शस्त्र अधिनियम १९५९ चेकलम ३ (२५) व महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) (३) सह १३५ प्रमाणे गुन्हा नोंद करुन युनिट २ चे पोलीस उप निरीक्षक गणेश माने यांनी आरोपीकडे कौशल्यपुर्ण सखोल तपास करुन व पोलीस नाईक १६०३ देवा राऊत यांनी तांत्रिक विश्लेषण करुन अटक आरोपीचा साथीदार प्रविण ऊर्फ डॉलर सिताराम ओव्हाळ वय ३२ वर्ष रा. समतानगर राजगुरुनगर ता. खेड जि. पुणे मुळ राहणार मु.पो. वाळद ता. खेड जि. पुणे यास दिनांक २८/०६/२०२४ रोजी खेड परिसरातुन शिताफीने ताब्यात घेवून गुन्हयामध्ये अटक केली. सखोल तपासामध्ये त्याचे कब्जातुन पुन्हा २ पिस्टल व २ जिवंत राउंड जप्त करण्यात आले. गुन्हयात सुमारे २ लाख रुपये किंमतीची ४ पिस्टल व ६ जिवंत काडतुस असा मुदेमाल आरोपींकडून हस्तगत करण्यात आला आहे.

अटक आरोपी दुर्गेश बापु शिंदे रा. श्रीरामपुर जि. अहमदनगर हा मध्यप्रदेशच्या सिमा भागात जावुन ग्रामीण भागातील लोकांना हाताशी धरुन देशी बनावटीची पिस्टले खरेदी करुन आणत असतो व

महाराष्ट्रभर फिरुन गुन्हेगारी प्रवृतीच्या लोकांना दाम दुपटीने विक्री करुन पैसे कमवितो. त्याचेवर सोलापुर, पुणे ग्रामीण, अहमदनगर जिल्हा, पिंपरी चिंचवड अशा ठिकाणी भारतीय शस्त्र अधिनियम कायद्यान्वये गुन्हे दाखल असुन तो सराईत गुन्हेगार आहे. आरोपी दुर्गेश शिंदे हा चिंचवड पोलीस स्टेशन गुन्हा रजिस्टर नंबर २६१/२०२३ भारतीय शस्त्र अधिनियम १९५९ चे कलम ३ (२५) प्रमाणे दाखल गुन्हयातील पाहीजे आरोपी आहे. त्याचा साथीदार आरोपी प्रविण ऊर्फ डॉलर सिताराम ओव्हाळ रा. राजगुरुनगर खेड हा शिरुर व खेड पोलीस ठाणेच्या रेकॉर्डवरील शरिराविरुध्द व मालाविरुध्दचे गुन्हे करणारा कुख्यात गुन्हेगार असुन प्रविण उर्फ डॉलर ओव्हाळ याने त्याचे साथीदार समवेत शिरुर हद्दीतील महाराष्ट्र बॅंकेवर पिस्टल व घातक हत्यारांसह भरदिवसा दरोडा टाकून लाखो रुपयांची लुट केली होती. तसेच घोडेगाव परिसरातील कुख्यात गुंडाचे अपहरण करुन निघृण खुन केल्याचा गुन्हा केला आहे. गुन्हयातील अटक आरोपी यांचेविरुध्द दाखल गुन्हयाचा सखोल तपास सुरु आहे.

सदरची कारवाई पिंपरी चिंचवडचे पोलीस आयुक्त श्री विनय कुमार चौबे, अप्पर पोलीस आयुक्त श्री वसंत परदेशी, पोलीस उप आयुक्त गुन्हे श्री संदिप डोईफोडे, सहाय्यक पोलीस आयुक्त गुन्हे श्री विशाल हिरे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा युनिट २ चे प्रभारी अधिकारी पोलीस निरीक्षक श्री जितेंद्र कदम, पोलीस उप निरीक्षक गणेश माने, श्रेणी पोलीस उप निरीक्षक केराप्पा माने, पोहवा. प्रमोद वेताळ, जयवंत राऊत, पोना देवा राऊत, आतिष कुडके यांनी केली आहे.

(संदिप डोईफोडे)
पोलीस उप आयुक्त गुन्हे
पिंपरी चिंचवड